ISSN:2454 – 7905 SJIF Impact Factor 2023 : 8.024
Worldwide International Inter DisciplinaryResearchJournal
A Peer Reviewed Referred Journal (Quarterly Research Journal)
Vol. I - ISSUE – LXXVI, Feb. 2023

**जनसेवा सेवाभावी प्रतिष्ठान, भोपणी द्वारा संचलित**

**कै. रसिका महाविद्यालय, देवणी जि. लातूर**

व

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

**एकदिवसीय राष्ट्रीय परिषद ( दि. ११-०२-२०२३, वार : शनिवार )**

# साहित्य समीक्षा व मराठी साहित्य

**संपादक**

**प्रा. डॉ. प्रशांत भंडे,**

**(मराठी विभागप्रमुख)**

**Research Journal Chief :** Mrs. Pallavi Laxman Shete
Principal, Sanskrti Public School, Nanded.(MH. India)Email:Shrishprakashan2009@gmil.com
**Director :** Mr. Tejas Rampurkar
(For International contact only +91-8857894082)
Address for Correspondence :House No.624 - Belanagar, Near Maruti Temple,Taroda (KH), Nanded – 431605(India –M.S.)
**Email:**Shrishprakashan2009@gmil.com Website: www.wiidrj.com

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | साहित्य समीक्षा : संकल्पना व स्वरूप - प्रा. अस्मिता वांद्रे | १० |
| २. | साहित्य समीक्षा : संकल्पना - प्रा. डॉ. राजेश तगडपल्लेवार | १३ |
| ३. | साहित्य समीक्षा : संकल्पना व प्रकार - प्राचार्य डॉ. चंद्रशेखर आत्माराम भगत | १५ |
| ४. | समीक्षेची संकल्पना, प्रयोजन व कार्य - प्रा. संदीप भागू चपटे | १८ |
| ५. | साहित्य समीक्षा संकल्पना व कार्य - डॉ. विष्णू नामदेव लांडे | २३ |
| ६. | समीक्षेच्या विविध पद्धती : स्थूल अवलोकन - संतोष मोहन जाधव | २७ |
| ७. | समीक्षेतील विविध संकल्पना, वाद यांचे विवेचन (स्त्रीवाद) - प्रा. चांदण पोपट साबळे | ३१ |
| ८. | मराठी साहित्य समीक्षा पद्धतीचे स्वरूप - डॉ. वंदना जयराम जाधव | ३५ |
| ९. | साहित्य समीक्षेमध्ये समीक्षकाचे व्यक्तिमत्व आणि भूमिका : एक तत्त्वचिंतन - प्रा. निलेश शंकरराव गायकवाड | ३९ |
| १०. | समीक्षेतील वास्तववाद : नवसंकल्पना - श्री. शरद प्रेमराज शेलार | ४२ |
| ११. | साहित्य समीक्षा : संकल्पना आणि स्वरूप - प्रा. अंगद श्रीपती भुरे | ४७ |
| १२. | समीक्षेच्या विविध पद्धती : एक आकलन - प्रा. डॉ. रंदिल गजेंद्र साहेबराव | ५० |
| १३. | मराठी साहित्य समीक्षेची समकालीनता - प्रोफेसर डॉ. विठ्ठल जंबाले | ५४ |
| १४. | समीक्षेच्या विविध पद्धती - फुले रागिनी बाबुराव | ५८ |
| १५. | साहित्य समीक्षा : संकल्पना व प्रकार - अर्जुन बंडू राठोड | ६० |
| १६. | स्वातंत्र्योत्तर मराठी समीक्षेची वाटचाल - प्रा. दत्ता रुस्तुमराव शिंदे | ६३ |
| १७. | प्राचीन भारतीय मीमांसाशास्त्र : नवे आकलन - मनोज रामजी मुनेश्वर | ६५ |
| १८. | निवडक पाश्चात्त्य विचारवंतांची स्त्रीविषयक भूमिका - कु. ऐश्वर्या बाळकृष्ण शेवाळे | ६८ |
| १९. | समीक्षेतील मराठी समीक्षकांचे योगदान - शुभम गजानन बुटले | ७३ |
| २०. | मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून समीक्षा - प्रा. विलास गाजरे | ७६ |
| २१. | उत्तर - आधुनिकता : निकष व मराठी साहित्य - प्रा. राजरत्न किशनराव दवणे | ८० |
| २२. | आदिबंधात्मक समीक्षा : एक दृष्टीक्षेप - प्रा. संजीवकुमार माने | ८५ |
| २३. | मराठीतील मानसशास्त्रीय व आदिबंधात्मक समीक्षेतील साहचर्य विचार - प्रा. सूर्य पुरुषोत्तम प्र. | ८८ |
| २४. | विविध समीक्षा पद्धतीत समन्वयाचे महत्त्व - प्रा. नरवाडे भास्कर विठ्ठलराव | ९३ |
| २५. | शालेय पाठ्यपुस्तकातील समीक्षा : स्वरूप आणि संस्कार - शीलवंत भिवा गाढवे | ९६ |
| २६. | पंडित आवळेकर यांच्या साहित्याची आस्वादक समीक्षा : वाङ्मय दर्शन - डॉ. संजीव कुमार पांचाळ | १०० |

# ५. साहित्य समीक्षा संकल्पना व कार्य

डॉ. विष्णू नामदेव लांडे
मराठी विभाग प्रमुख,
मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, वाशीम जि. वाशीम ४४४५०५

साहित्य व समीक्षेचे घनिष्ट असे नाते आहे. ज्याप्रमाणे एखाद्या झाडाचे त्याच्या सावलीसोबत जसे नाते असते, तसेच साहित्य व समीक्षेचे नाते असते. या दोहोमध्ये प्रथमतः साहित्याचा जन्म होतो. त्यानंतर त्या साहित्यकृतीची समीक्षा होत असते. यामुळे साहित्याबरोबरच समीक्षेचेही अनन्यसाधारण असे महत्व असल्याचे दिसून येते. समीक्षेमुळे साहित्याच्या सर्वांगांची चिकित्सा करता येते, साहित्यकृतीच्या यशापयशाची चिकित्सा करता येते. समीक्षा ही वाचक व लेखक यांना प्रसंगी दिाा दर्शविण्याचेही काम करते. म्हणूनच समीक्षेचे स्वरूप हे विविधांगी असल्याचे मानले जाते. समीक्षेमध्ये कलावंत, कलाकृती आणि समीक्षा या घटकांना महत्व असते. कोणतीही कलाकृती एकदा निर्माण झाल्यानंतर त्या त्या लेखकाचे काम संपते. परंतु कलाकृती जेव्हा निर्माण होते, तिथूनच खऱ्या अर्थाने समीक्षा व समीक्षकाचे कार्य सुरू होत असते.

समीक्षेसाठी सुरूवातीला 'टीका' हा शब्दप्रयोग वापरल्या जात होता. परंतु 'टीका' हा ाब्द समीक्षेसाठी समर्पक व संयुक्तिक वाटत नाही. टीकेमध्ये बऱ्याचदा गुणांची चिकित्सा न करता, अधिक तर दोषांरोपण करण्यावरच अधिक भर दिला जातो. परंतु अशा मर्यादित अर्थाने समीक्षा हा शब्द अभिप्रेत नसतो. साहित्याच्या सर्वांगांची चिकित्सा ही समीक्षेतून अभिप्रेत असते. 'समीक्षा' हा शब्द 'सम' + 'ईक्ष' या मूळ घटक शब्दापासून तयार झाला आहे. 'सम' म्हणजे सर्व अंगानी किंवा चारही बाजूंनी असा होतो. तर 'ईक्ष' म्हणजे पहाणे, विचार करणे, न्याहाळणे असा होतो. समीक्षेसाठी इंग्रजीतील Criticisum हा ाब्द वापरला जातो. to criticise या धातुपासून हा शब्द तयार झाला आहे. याचा अर्थ टीका करणे किंवा चिकित्सा करणे असा होतो.

**समीक्षेच्या व्याख्या :** डॉ. रा.ग. जाधव : - 'ललित साहित्याचे आकलन, आस्वाद व मूल्यमापन करण्यासाठी गांभीर्याने होणारा विचारप्रवाह म्हणजे समीक्षा.'

प्रा. वा. ल. कुलकर्णी : - 'टीका हा कधी न संपणारा शोध आहे.'

गो. म. कुलकर्णी : - 'परिस्थिती कोणतीही असली तरी टीकावृत्ती ही उपजतच असते. व्यक्तिपरत्वे तिचा अविष्कार कमी अधिक प्रमाणात होतो हा भाग वेगळा या अविष्काराला विशिष्ट घाट आला की तिला टीका समीक्षा असे संबोधले जाते.'

बुनेनियर :- 'विवरण करणे व निर्णय देणे हे टीकेचे प्रयोजन आहे.'

मॅथ्यू ऑरनॉल्ड : - 'पूर्वग्रह न बाळगता केलेले रसग्रहण म्हणजे टीका होय.'

जॉन ड्युई :- 'समीक्षा म्हणजे निर्णय.'

विंचेस्टर :- 'कोणत्याही कलेचे बौध्दिक रसग्रहण म्हणजे समीक्षा होय.'

ग्रॅहम :- 'विचार करण्याच्या शास्त्रीय पध्दतीला अनुसरून काही निचित तत्वाच्या आधारे वाड्मयाचे विवेकपूर्ण विश्लेषण करण्याची जी शक्ती असते ती समीक्षा होय.'

ना. वा. गोडबोले, गं.ना. जोगळेकर :- 'स्वतः कोणताही बरावाईट अनुभव घेणे, अशा अनेक अनुभवांच्या आधारे आपले मत बनविणे, इतरांचे आाचप्रकारचे मत समजावून घेणे, दुसऱ्याचे जे पटत नाही ते खोडून काढणे, जे स्वतःला विचारांती पटते त्याचा आग्रह धरणे या सर्व प्रक्रियेमधूनच समीक्षा सिध्द होत असते. '

वरील व्याख्यांवरून समीक्षा म्हणजे विवरण, विश्लेषण, बौध्दिक रसग्रहण, अर्थनिर्णयन करणे, निर्णय देणे, टीका, बरावाईट अनुभव मांडणे, मूल्यमापन करणे, मागोवा घेणे असे विविध अर्थ अभ्यासक सांगताना दिसून येतात. समीक्षा ही साहित्याला नवा अन्वयार्थ प्राप्त करून देते. साहित्यकृतीतील सौंदर्य स्थळांचा शोध घेण्याच्या कामी मदत करते. त्यामुळेच साहित्य व समीक्षा हे परस्परावलंबी असलेले दिसून येतात. थोडक्यात साहित्यकृतीच्या सर्वांगीण चिकित्सेलाच समीक्षा असे म्हटले जाते.

**समीक्षेचे कार्य :**

साहित्य समीक्षेतून वाड्मयीन रहस्यांचा शोध घेता येतो. कोणतीही समीक्षा ही एखाद्या कलाकृतीचे दोषारोपण दर्शवावे किंवा त्या कलाकृतीची

अवास्तव स्तुती करावी, या भावनेतून निर्माण होत नसते. तर समीक्षक हा समीक्षेच्या माध्यमातून त्या त्या साहित्यकृतीतील वाङ्मयीन रहस्यांचा नेमकेपणाने शोध घेण्याचा प्रयत्न करीत असतो.

समीक्षक हा आपल्या समीक्षेतून साहित्यिकांकडून घडलेल्या चुका ह्या नजरेत आणून देत असतो. या चुका कदाचित साहित्यिकाला लक्षात येतील, कदाचित येणारही नाहीत. आावेळी समीक्षक मात्र निपक्षपातीपणे त्या त्या कलाकृतीची चिकित्सा करीत असतो. त्यामुळे त्याला जे वाटते ते, तो बिनधास्तपणे मांडत असतो. समीक्षकाने नोंदविलेल्या अभिप्रायाची योग्य ती साहित्यिकाने दखल घेतली, तर साहित्यिक हा त्याच्या नंतरच्या कलाकृतीत आा चुकांमध्ये सुधारणा करू ाकतो. म्हणजेच समीक्षकाच्या चिकित्सेमुळे तो तो साहित्यिक हा आपल्या साहित्य विवाकडे डोळसपणे पाहू ाकतो.

साहित्यकृतीला शिस्त व वळण लावण्याचे काम समीक्षा करते. एखादा साहित्यिक हा साहित्यातील सर्वच प्रकारामध्ये लेखन करण्याचा प्रयत्न करीत असतो. यापैकी अनेक वाङ्मय प्रकार साहित्यिकांना हाताळता येत नाहीत. एखादा प्रकार तो सामर्थ्याने मांडू शकतो. अशावेळी समीक्षक मात्र त्या त्या साहित्यिकांचे सामर्थ्यस्थान व कमजोरी समीक्षेच्या माध्यमातून दर्शविण्याचा प्रयत्न करीत असतो. यातूनच साहित्यकृतीला योग्य वळण लावण्याचे काम समीक्षेतून होते.

समीक्षा ही वाचक व लेखकाला प्रगल्भ करण्याचे काम करते. वाचकाच्या लक्षात न आलेले साहित्यकृतीतील कितीतरी दुवे समीक्षक हा त्याच्या निर्दानास आणून देत असतो. तो वाचक व लेखकांना प्रंसगी शहाणे करण्याचा प्रयत्न करीत असतो. तो साहित्याच्या अंतरंगात शिरून साहित्यकृतीची परखडपणे मींमासा करीत असतो. त्याच्या या मींमासेमुळे वाङ्मयीन वातावरण स्वच्छ व निरोगी होत असते. एकप्रकारे वाचक व लेखकाला सुजाण बनविण्याचे काम समीक्षेमुळे होत असते. साहित्यकृतीचे समीक्षण करताना, त्या साहित्यकृतीचे आकलन जितके विविधांगी व सखोल असेल, तितका त्या साहित्यकृतीचा आस्वाद घेता येतो.

समीक्षेमुळे श्रेष्ठ कलाकृतीचे निकष ठरविण्यास मदत होते. सामान्य वाचकाला कोणती कलाकृती श्रेष्ठ किंवा कनिष्ठ हे एकदम ठरविता येत नाही. त्यामुळे अशावेळी वाचक हा त्या कलाकृतीबद्दल आपले मत बनविण्यासाठी, त्यावर समीक्षकांनी काय अभिप्राय दिला आहे हे तपासत असतो. यावरूनच तो ही आपले चांगले-वाईट असे मत नोंदवित असतो. यामुळेच श्रेष्ठ साहित्यकृतीचे निकष ठरविण्यास समीक्षा मदत करीत असल्याचे दिसून येते.

समीक्षेमुळे साहित्यातील सौंदर्याचा शोध घेता येतो. एखाद्या कलाकृतीत असलेल्या सौंदर्य स्थळांचा शोध घेणे किंवा कलाकृतीत सौंदर्याची हानी झाली असेल तर त्याची कारणे शोधण्याचे काम समीक्षा करीत असते. त्यामुळे समीक्षेमुळे कोणत्याही साहित्यकृतीतील सौंदर्य स्थळांचा शोध घेता येणे शक्य होते. साहित्यकृतीतील सौंदर्याचा नेमकेपणा शोधता येतो. साहित्यकृतीतील सौंदर्याच्या कमतरतेची कारणेही शोधता येतात. एखाद्या कलाकृतीत सौंदर्याची हानी का झाली ते ही समीक्षेतून शोधता येते

समीक्षा ही वाचकांच्या मनात कलाकृतीविषयीचे कुतूहल निर्माण करीत असते. एखाद्या साहित्यिकांने त्याच्या साहित्यकृतीमध्ये एखादा नवीन विषय हाताळला काय किंवा साहित्यविवाला अपरिचित असलेले नवीन सूत्र देण्याचा प्रयत्न केला काय यासारख्या अनेक बाबींची जिज्ञासा वाचकाच्या मनात निर्माण करण्याचे काम समीक्षा करते. समीक्षा हिच वाचकाला आकर्षित व परावृत्त करण्याचेही काम करते. कोणतेही साहित्य हे वाचकांनी वाचावे किंवा वाचू नये अशी दिशा देण्याचे काम समीक्षक हा आपल्या समीक्षेतून करीत असतो. एकप्रकारे वाचकांचा वाटाड्या म्हणूनच समीक्षक कार्य करीत असतो.

कोणतेही साहित्य निर्माण होण्यामागची पार्श्वभूमी ही समीक्षक शोधण्याचा प्रयत्न करीत असतो. समीक्षकाच्या विवेचनातून बऱ्याचदा ते ते साहित्य का निर्माण झाले, याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला जात असतो. यातून एकप्रकारे त्या त्या साहित्यकृतीच्या निर्मितीप्रकियेचा शोध घेता येतो. समीक्षेत कालतत्व महत्वाचे असते. साहित्यात विशिष्ट काळात विशिष्ट असे साहित्य प्रकार व वाङ्मयीन प्रवाह निर्माण होत असतात. याविषयीची कारणमींमासा समीक्षेतून शोधता येते. मराठीत दलित साहित्य हा नवा प्रवाह सुरू झाल्यानंतर, समीक्षेने मात्र हा प्रवाह का सुरू झाला, त्याच्या प्रेरणा काय, या साहित्याचे वेगळेपण काय यासारख्या गोष्टी शोधण्यास मदत केली आहे.

समीक्षा ही मूळ ग्रंथाची ओळख करून देते. समीक्षक हा उत्तम वाचक असतो. तो साहित्यकृतीच्या मुखपृष्ठापासून ते मलपृष्ठापर्यंतच्या सर्व भागांची सांगोपांग चिकित्सा करीत असतो. त्याची ही समीक्षा वृत्तमानपत्र, नियतकालिके व समीक्षा ग्रंथात प्रसिध्द होते. बऱ्याचदा या समीक्षेचे वाचन करून अनेक वाचक मूळ कलाकृतीचे वाचन करण्यासाठी वळले असल्याची उदाहरणे आढळून येतात.

समीक्षा साहित्य व वाचक याच्यातील दुवा म्हणूनही काम करते. एखाद्या साहित्यिकाच्या साहित्यातून चित्रीत झालेले प्रतिबिंब चांगले किवा वाईट

हे समीक्षेतून सांगितले जाते. बऱ्याचदा समीक्षा ही वाचकाला मार्गदर्शक ठरत असते. साहित्यकृतीतील अनेक घटनाप्रसंगांची उकल वाचकास होत नाही. अनेक संदर्भाचा मतितार्थ वाचकांना लागत नाही. ओघेळी समीक्षक आपल्या समीक्षेतेतून वाचकांना जाणवणाऱ्या अनेक समस्यांबाबतची उकल करून देण्याचा प्रयत्न करीत असतो. साहित्य व वाचक हे परस्परावलंबी असतात. आावेळी साहित्य व वाचकातील दुवा म्हणून समीक्षा कार्य करताना दिसते.

समीक्षा साहित्यिकांचे साहित्यातील स्थान निश्चित करीत असते. साहित्यिक लिखाण करीत असताना अनेक प्रकारचे लेखन करीत असतो. परंतु समीक्षक हा साहित्यिकाच्या कलाकृतीचे समीक्षण करून, ते साहित्य कोणत्या प्रवाहातील आहे, कोणत्या प्रकारातील आहे हे निश्चित करीत असतो. त्यामुळेच तो तो साहित्यिक ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, नवकवी, आधुनिक कवी यासारखी विभागणी करून, त्या साहित्यिकाचे स्थान निश्चित करीत असतो.

समीक्षा ही साहित्यातील मुल्यांचा शोध घेते. साहित्यातून कोणकोणते मूल्य आलेले आहेत, ते शोधण्याचे काम समीक्षक हा आपल्या समीक्षेतून करीत असतो. साहित्य हे कलावादी आहे की जीवनवादी हे ही समीक्षेच्या आधारे ठरविता येते. ाविाय साहित्यकृतीतून चित्रीत झालेला मानवतावाद, जीवनमूल्य, स्वातंत्र्य, समता, बंधुता, विज्ञानवाद, वेदना, विद्रोह, नकार यासारख्या कितीतरी मूल्यांचा शोध समीक्षक हा आपल्या समीक्षेतून घेत असतो.

समीक्षा ही साहित्याला नवा अन्वयार्थ लावण्याचे काम करते. कोणत्याही लेखकाने निर्माण केलेल्या साहित्याचा एकच एक अर्थ सांगता येत नाही. साहित्यकृतीतून अनेक अर्थ ध्वनीत होत असतात. अशावेळी समीक्षक त्या त्या कलाकृतीला नवा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न करतो. साहित्यात योग्य किंवा अयोग्य काय असते हे सांगण्याचा प्रयत्न समीक्षक हा आपल्या समीक्षेतून करीत असतो. मराठीतील अनेक लेखकाचे साहित्य दूर्लक्षित होते. परंतु समीक्षकाने त्या साहित्यकृतीची चिकीत्सा केल्यानंतर त्या त्या कलाकृती प्रसिध्द झालेल्या दिसून येतात. त्यामुळेच साहित्यात काय चांगले किंवा काय वाईट हे सांगण्याचे काम समीक्षा करते.

समीक्षा ही कलाकृतीबरोबरच त्या त्या लेखकाचा काळ, चरित्र याची ओळख करून देते. समीक्षेतून साहित्यिकाच्या कलाकृतीवरच नुसते भाष्य केलेले नसते, तर लेखकाचे चरित्र, लेखकावर पडलेला विविध विचारधारेचा प्रभाव यासारख्या कितीतरी बाबींची उकल समीक्षक हा समीक्षेतून करीत असतो.

साहित्य क्षेत्रात कलाकृतीबरोबरच समीक्षेलाही महत्व असते. असे असले तरीही कोणतीही समीक्षा ही कलाकृतीचे सर्वांगीण रहस्य उलगडू शकत नाही. त्यामुळे कोणतीही समीक्षा ही परिपूर्ण आहे असे म्हणता येत नाही. समीक्षा करणाऱ्या समीक्षकाकडे संवेदनाीलता, वस्तुनिष्ठता, यथार्थता, तटस्थपणा, निपक्षपातीपणा, रसिकता, व्यासंग, विलेषकता, चिकित्सक वृत्ती, मूल्यविवेक, बहुश्रुतता, कल्पकता, मर्मग्राही बुध्दिमत्ता, स्वागतशील वृत्ती यासारखे गुण असणे गरजेचे असते. समीक्षकाने एखाद्या कलाकृतीवर भाष्य करताना, त्यावर निव्वळ टीकेची झोडही उठविता कामा नये. असे केल्याने बऱ्याचदा कलावंताला 'टीकाकार हे आपले मित्र नसून शत्रू आहेत.' असे वाटायला लागते. एवढेच नव्हे तर कलावंतानेही समीक्षकाला समजून घेणे गरजेचे असते. बऱ्याचदा साहित्यिकांना असे वाटते की, समीक्षकांनी आपली व आपल्या साहित्यकृतीची नुसती स्तुतीच करावी व आपण जे ही लिहू ते कसे श्रेष्ठ प्रतीचे आहे हेच सांगत सुटावे, अशीही अपेक्षा समीक्षकाकडून करता कामा नये.

यावरूनच साहित्याबरोबरच समीक्षेचेही महत्व असल्याचे दिसून येते. समीक्षा ही वाङ्मयीन रहस्याचा शोध घेते. समीक्षेमुळे साहित्यिक हा आपल्या साहित्याकडे डोळस नजरेने पाहू शकतो, साहित्यकृतीला शिस्त व वळण लागू शकते, वाचक व लेखकाला प्रगल्भ करण्याचे काम होते, श्रेष्ठ कलाकृतीचे निकष ठरविता येतात, साहित्यातील सौंदर्याचा शोध घेता येतो, वाचकांच्या मनात कलाकृतीविषयी कुतूहल निर्माण होते, साहित्यकृतीच्या निर्मितीप्रक्रियेचा शोध घेता येतो, मूळ ग्रंथाची ओळख करून घेण्यास मदत होते, साहित्य व वाचक यांच्यातील दुवा म्हणून काम करते, साहित्यिकाचे साहित्यातील स्थान निचित करता येते, साहित्यातील मुल्यांचा शोध घेता येतो, साहित्याला नवा अन्वयार्थ लावता येतो, साहित्यविषयक प्रनांची चर्चा करता येते, साहित्यातील योग्य काय अयोग्य काय हे समजण्यास मदत होते. लेखकाच्या कलाकृतीबरोबरच त्याचे चरित्र, त्याच्यावरील प्रभाव, साहित्यलेखनाच्या प्रेरणा, प्रयोजन, तत्कालीन काळ यासारख्या कितीतरी घटनाक्रमांवर समीक्षेतून प्रकाशझोत पडत असतो. यामुळेच समीक्षकाचे कार्य हे एखाद्या ास्त्रक्रिया करणाऱ्या डॉक्टरासारखे असल्याचे दिसून येते. मूळ साहित्यकृती व तिचे स्वत्व कायम ठेऊन, समीक्षक हा त्या त्या साहित्यकृतीमधील अंगोपांगांची चिकित्सा करण्याचा प्रयत्न करीत असतो.

- **संदर्भ ग्रंथ :**

१) साहित्य समीक्षा स्वरूप आणि विकास, ना. वा. गोडबोले, गं.ना. जोगळेकर, व्हीनस प्रकाशन, पुणे, १९८१,
२) साहित्य समीक्षा, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे
३) समीक्षा सिध्दांत आणि उपयोजन, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर
४) उपयोजित समीक्षा, मुंबई विद्यापीठ, मुंबई